रोजगार हमी योजनेखाली जवाहर विहिर
कार्यक्रम लाभार्थी निवडीबाबत......

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक:जविका-२०००/प्र.१६६/रोहयो-५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ११ ऑगस्ट, २००८.

वाचा :- १) शासन निर्णय,नियोजन विभाग,क्रमांक:जविका-१२९८/प्र.१०४/रोहयो-१०
दिनांक १.७.१९९९.
२) शासन निर्णय,नियोजन विभाग,क्रमांक:जविका-२०००/प्र.६/रोहयो-१०
दिनांक २४.८.२०००

**शासन निर्णय :-**

दिनांक २४ ऑगस्ट, २००० रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद ३ प्रमाणे रोहयो जवाहर विहिर या योजनेखाली निवड करावयाच्या लक्षित लाभार्थ्यांचे प्रमाणे खालीलप्रमाणे आहे :-

१. २० टक्के मागासवर्गीय अल्पभूधारक (५ एकरपर्यन्त जमीनधारक)
२. ४० टक्के अमागासवर्गीय अल्पभूधारक (५ एकरपर्यन्त जमीनधारक)
३. ४० टक्के लाभार्थी नाबार्डच्या व्याख्येनुसार पावसाच्या पाण्यावरील शेतीवर अवलंबून असलेले/कोरडवाहू अल्पभूधारक.

मागणी अनु.क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या लाभार्थी निवडीतील निकषात बदल करण्याची मागणी अनेक लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेली आहे. या मागणीचा विचार करुन शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

२. उपरोक्त अनु.क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या नाबार्डच्या व्याख्येनुसार लाभार्थी मिळाले नाहीतर शिल्लक कोटयाकरिता प्रथम अनु.क्र. १ मध्ये दर्शविलेल्या निकषा नुसार लाभार्थ्यांची निवड करावी आणि त्यांनतर उर्वरित कोटयाकरिता अनु.क्र. २ मध्ये दर्शविलेल्या निकषानुसार लाभार्थ्यांची निवड करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( दिव्या शेट्टीगार )
कक्ष अधिकारी,नियोजन विभाग.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त.
महालेखापाल -१(लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल -२(लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-२ (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, नागपूर.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो).
उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,(रोहयो समिती).
कक्ष अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
लेखा अधिकारी, कार्यासन-रोहयो-७.( ५ प्रतींसह).
प्रत माहितीसाठी - मुख्य अभियंता व सह सचिव (रोहयो)/उप सचिव (रोहयो).

D:\My Document\2008\mayekar\MAYEKAR\2008\072008 166 G.r